# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत (दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. 832 ए, शिवाजीनगर पुणे 411004**

दूरध्वनी क्र.:-020-29709396 वेबसाइट :-www.mscepune.in ई-मेल : mscepune@gmail.com


जा.क्र.मरापप/स्वी.सहा/ 207/2026

दि. 15/05/2026

## परिपत्रक

**विषय ÷ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून विकसित केलेल्या मोबाईल हजेरी ॲपवर संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालकांकडून विद्यार्थ्यांची हजेरी नोंदविण्याबाबत...**

संपूर्ण राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे नोंदणी असलेल्या 3000 पेक्षा जास्त संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था असून या संस्थांमधून वर्षभरातील दोन सत्रांमधून किमान चार ते पाच लक्ष विद्यार्थी प्रशिक्षण घेत असतात. परीक्षा परिषदेकडे काही संस्थाचालकांकडून गैरप्रकार किंवा अनधिकृतपणे त्यांच्या संस्थांमध्ये प्रत्यक्षात प्रशिक्षण घेत नसताना देखील विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी जिल्हा किंवा राज्य संघटनेच्या बैठकांमध्ये प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने परीक्षा परिषदेने सप्टेंबर 2025 मध्ये, सर्व संस्थाचालकांसाठी बायोमेट्रिक मशीनद्वारे(Face Recognition सह) हजेरी नोंदविण्याची सक्ती केली होती. तथापि काही संस्थांकडून बायोमेट्रिक मशीनमधील हजेरी एडिट करून त्यामध्ये बदल करून परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.त्याचबरोबर काही संस्थांनी त्यांच्या संस्थेतील बायोमेट्रिक मशीन संस्थेत न बसवता अनधिकृतपणे इतर संस्थेमध्ये बसवलेले आढळले.तसेच बायोमेट्रिक अटेंडन्स अपलोड न करण्याच्या किंवा कोरी अटेंडन्स शीट अपलोड करण्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत.

टंकलेखन संस्थांकडे असलेल्या विविध कंपनीच्या बायोमेट्रिक मशीनला कोणत्याही प्रकारे जिओ टॅगिंग(Geo Tagging) किंवा जिओ फेन्सिंग(Geo Fencing) नसल्याकारणाने प्रत्येक संस्थेवर लक्ष ठेवण्यास येणाऱ्या मर्यादा लक्षात घेता, सर्व संगणक टंकलेखन संस्थांमध्ये हजेरीबाबत सुलभता येण्यासाठी आणि अनधिकृत प्रवेशांना प्रतिबंध घालण्यासाठी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने संस्थेमध्ये येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची हजेरी संस्थेमध्येच नोंदविण्यासाठी जिओ फेंसिंग युक्त MSCE GCC TBC Attendance या नावाने मोबाईल ॲप विकसित केलेले आहे. **सदर ॲप गूगल प्ले स्टोअरवर (Google Play store) उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.** यापुढे संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणार्या सर्व विद्यार्थ्यांची Face Recognition च्या माध्यमातून मोबाईल द्वारे हजेरी घेणे **सर्व संस्थाचालकांसाठी अनिवार्य व सक्तीचे करण्यात येत आहे**. मोबाईल ॲपमध्ये सर्व संस्थाचालकांनी संस्था रजिस्टर करणे बंधनकारक असून, त्याद्वारे विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी घेण्यात येणार आहे.

सदर मोबाईल हजेरीचे अॅप संस्थाचालकांना कायमस्वरूपी मोफत उपलब्ध करून देण्यात येत असून, त्या पोटी कोणतेही शुल्क परीक्षा परिषदेकडून वसूल करण्यात येणार नाही.

**MSCE GCC TBC Attendance** हा App गुगल प्ले स्टोअर (Google Playstore ) वर उपलब्ध आहे. त्याचबरोबर त्याची लिंक देखील सर्व संस्थाचालकांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर लिंक आपल्या मोबाईल मध्ये Copy करून, किंवा गुगल प्ले स्टोअर वरून अॅप इन्स्टॉल करण्याची कार्यवाही करावी.

मोबाईल वरील हजेरी अॅपचा वापर कसा करावा? याचा फ्लो चार्ट (Flow Chart) सोबत दिलेला असून त्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील ÷

1. Google Play store वरून **MSCE GCC TBC ATTENDANCE** अॅप डाऊनलोड करावे. सदर हजेरीचे अॅप केवळ संस्थाचालकांनाच डाउनलोड करता येईल.विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर ही सुविधा देता येणार नाही.
2. **सर्व संस्थाचालकांनी आपल्या संस्थेमध्येच सदर अॅप डाऊनलोड करावे.** MSCE **GCC TBC Attendance** App मोबाईलमध्ये उघडल्यानंतर सर्वप्रथम LOGIN आणि SIGNUP असे टॅब दिसतील. संस्थाचालक यांनी सर्वप्रथम हे मोबाईल अॅप उघडल्यानंतर SIGNUP करणे गरजेचे आहे. SIGNUP टॅब दाबून संस्थाचालकांनी SEARCH ऑप्शन वर जाऊन आपल्या संस्थेचा 5 आकडी संस्था कोड टाकायचा आहे.
3. संस्था कोड टाकल्यानंतर संस्थाचालकास संस्थेचा तपशील, जसे की संस्थेचे नाव, संस्थाचालकाचे नाव, मोबाईल नंबर व ईमेल आयडी दिसेल. **Send OTP** बटन दाबावे. परीक्षा परिषदेच्या पोर्टलवर Institute General Information या माहितीमध्ये आपण जो मोबाईल नंबर व ईमेल पत्ता नोंदविलेला आहे,त्याच ईमेल पत्त्यावर OTP येणार आहे. हा OTP अॅपमध्ये टाकल्यानंतर SUBMIT बटन दाबावे. अॅपमध्ये संस्थाचालकांनी स्मरणात ठेवण्याजोगा 8 अंकी Password टाकायचा आहे. निदेशकाच्या दुसऱ्या मोबाईल मध्ये APP रजिस्टर करताना या 8 अंकी पासवर्ड चा उपयोग होणार आहे. या सर्व बाबी आपणाला संस्थेमध्येच करावयाच्या आहेत. SIGNUP ची प्रक्रिया पूर्ण होऊन आता LOGIN Page दिसेल.
4. LOGIN चे बटन दाबून संस्था कोड व 8 अंकी पासवर्ड टाकल्यानंत,र CATCHA मधील अक्षरे / अंक टाकल्यानंतर संस्थाचालकास **दैनंदिन वापरासाठी 4 आकडी PIN नंबर** नोंदवावा लागणार आहे. आता आपल्याला संस्थेचे लोकेशन नोंदवायचे आहे. लोकेशन नोंदवताना आपल्याला अनिवार्यपणे संस्थेमध्येच उपस्थित राहावे लागेल.लोकेशन नोंदवताना संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेच्या मध्यभागी उभे राहावे, जेणेकरून संस्थेमध्ये प्रत्यक्षात हजेरी नोंदवताना 30 मीटरच्या परिघामध्ये (15 Metre Radius) विद्यार्थ्याला हजेरी नोंदविता येऊ शकेल. एकदा संस्थेचे ठिकाण(Geo Fencing) अॅपमध्ये नोंदवल्यानंतर त्यामध्ये नंतर कोणत्याही प्रकारचा

बदल करता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावयाची आहे. महत्वाचे म्हणजे एका संस्थाचालकाला एकूण चार मोबाईल सेट मध्ये सदर ॲप डाऊनलोड करता येणार असल्याने, पहिल्या संस्थाचालकाच्या मोबाईल मध्ये ज्या संस्थेच्या ठिकाणी रजिस्ट्रेशन केलेले होते, त्याच ठिकाणी म्हणजे संस्थेच्या आवारातच पुढील प्रत्येक मोबाईल मध्ये नोंदणी होईल, इतरत्र नाही. याचाच अर्थ संस्थाचालकांनी जबाबदारीने स्वतःच्या संस्थेमध्ये हजर राहून स्वतःच्या मोबाईल मध्ये सुरुवातीला ॲप इंस्टॉलेशन करून नोंदणी करावयाची आहे. या प्रक्रियेमुळे सुरक्षितता राहून इतर कोणाकडूनही या ॲपचा गैरवापर होऊ शकणार नाही.हा 4 आकडी PIN नंबर आपल्याला कायमस्वरूपी लक्षात ठेवायचा आहे. संस्थेमध्ये दररोज सकाळी ॲप उघडल्यानंतर हजेरी नोंदवण्यापूर्वी संस्थाचालक किंवा निदेशकाने हा PIN नंबर टाकल्यानंतरच हजेरी ॲप उघडणार आहे.दिवसभर LOGOUT न केल्यास तो तसाच राहील व रात्री बारा वाजता आपोआपच लॉक होईल.

5. संस्थाचालकांचा पहिला मोबाईल, लोकेशन सह रजिस्टर झाल्यानंतर त्यापुढील इतर मोबाईल मध्ये सिम कार्ड नसले, तरी देखील अशा सिम कार्ड नसलेल्या मोबाईल मधून ॲपचा वापर संस्थेमध्ये करता येईल. म्हणजेच सिम कार्ड नसलेल्या मोबाईलवर देखील वायफाय वरील नेट च्या आधारे आपल्याला हजेरी नोंदवता येऊ शकेल. नोंदविलेल्या जिओ लोकेशन पासून चारही बाजूला 15 मीटर अंतरापर्यंतच विद्यार्थ्यांची हजेरी नोंदवली जाऊ शकते याची संस्थाचालकांनी विशेष नोंद घ्यावी.
6. पिन नंबर टाकल्यानंतर परीक्षा परिषदेकडून ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या डाटाबेस मधून संस्थेमध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची यादी व घेतलेले विषय दिसू लागतील. हजेरीच्या मोबाईल ॲपमध्ये संस्थाचालकास वेगळ्याने विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला परीक्षा शुल्क भरल्यानंतर आपोआपच परीक्षा परिषदेच्या सॉफ्टवेअर मधून विद्यार्थ्यांचे नाव मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. सुरुवातीला उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे नाव SEARCH करावे लागेल. सदर कार्यवाही विद्यार्थ्यांवर न सोपवता निदेशक किंवा संस्थाचालकांनी स्वतः करावयाची आहे. या विद्यार्थ्यांचे नाव क्लिक केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचा फोटो संस्थाचालकांनी एकदाच सुरुवातीला ॲपमध्ये नोंदवायचा(Capture) आहे. पहिल्यांदा विद्यार्थ्यांचे छायाचित्र (Face Registration) मोबाईलच्या **पाठीमागील कॅमेऱ्यानेच** काढावयाचे असून विद्यार्थ्यांच्या पाठीमागील भिंत साधी (Plain Color without any Dark Colors, Objects or Photographs) असणे आवश्यक आहे. यामुळे नियमित हजेरी नोंदवताना कोणताही त्रास होणार नाही. प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरल्यानंतर Face Registration ही प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागणार असून, त्यासाठी प्रति विद्यार्थी 1 ते 2 मिनिटे लागू शकतात हे कृपया लक्षात घ्यावे. पहिल्यांदा फोटो काढताना (Face

Registration) डोळ्यांची किमान एक ते दोन वेळा उघडझाप करणे आवश्यक आहे, तसेच संपूर्ण चेहरा मोबाईल मधील अंडाकृती(Oval) फ्रेम मध्ये आल्यावरच व्यवस्थित नोंदणी होईल.

7. हजेरी नोंदविण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी संस्थाचालकांना 4 व्यक्तींच्या मोबाईलवर (स्वतःच्या, सहाय्यकाच्या किंवा निदेशकांच्या) हजेरीचे ॲप डाऊनलोड करून विद्यार्थ्यांची हजेरी नोंदविता येऊ शकेल.
8. प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश करताना आणि प्रशिक्षण संपल्यानंतर बाहेर जाताना मोबाईलवर हजेरी नोंदविणे अनिवार्य राहील. यासाठी विद्यार्थ्याला प्रत्येक वेळी संस्थेमध्ये येताना व प्रशिक्षण झाल्यानंतर बाहेर जाताना मोबाईलसमोर (Front Camera) उभे रहावे लागेल, In/Out हजेरी नोंदवताना(Selfie) प्रत्येक वेळी मोबाईल मध्ये अंडाकृती (Oval) फ्रेम मध्ये चेहरा आल्यानंतर एकदा डोळ्यांची उघडझाप करावी लागेल. यासाठी अवघे काही सेकंद लागतात. प्रवेश करताना केवळ हजेरी नोंदवली व प्रशिक्षण संपल्यानंतर बाहेर जाताना जर विद्यार्थ्यांनी ॲप मध्ये हजेरी नोंदवली नाही, तर विद्यार्थ्यांची त्या दिवसाची हजेरी नोंदवल्या जाणार नाही.
9. सत्रामध्ये उशिरा प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे सराव करता यावा, याकरिता प्रशिक्षणासाठी जास्तीचा वेळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्याला एकाच वेळी एका दिवसात एका विषयासाठी दोन तासांपर्यंत हजेरी नोंदविता येईल. म्हणजेच सत्रामध्ये जर एकापेक्षा जास्त विषय विद्यार्थ्यांनी घेतलेले असतील, तर जास्तीत जास्त दुप्पट वेळ एका दिवसात हजेरी ॲपवर नोंदविता येऊ शकेल. उदा.जर एखादया विद्यार्थ्याचे दोन विषय असतील, तर त्याला एका दिवसात जास्तीत जास्त चार तासांपर्यंत ॲपवर हजेरी नोंदविता येईल. तथापि त्यासाठी मात्र विद्यार्थ्याला प्रशिक्षण झाल्यानंतर अनिवार्य पणे ॲपमध्ये Time Out नोंदवावे लागणार आहे.
10. मोबाईल हजेरी ॲपमधील सर्व विद्यार्थ्यांचे नोंदविलेले मासिक हजेरी पत्रक सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात संस्थाचालकांना कायमस्वरूपी साठवून ठेवणे बंधनकारक राहील. प्रत्येक सत्र झाल्यानंतर त्या सत्र मधील सर्व महिन्यांचे हजेरी पत्रकाची पीडीएफ सॉफ्ट कॉपी हार्ड डिस्क मध्ये साठवून ठेवावी लागेल.
11. सत्र सुरू झाल्यानंतर LMS सॉफ्टवेअर प्रमाणेच हजेरीचे ॲप देखील सत्राच्या सुरुवातीपासूनच वापरणे सक्तीचे राहणार असल्यामुळे संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांची नोंदणी शक्यतो सत्राच्या पहिल्या पंधरवाड्यातच (संपूर्ण परीक्षा शुल्क भरून) आटोपून घ्यावी, जेणेकरून परिषदेच्या हजेरीच्या सॉफ्टवेअरमध्ये नियमितपणे प्रशिक्षणास येत असणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद वेळेवर करता येऊ शकेल. संगणक टंकलेखन / लघुलेखन परीक्षेकरिता प्रविष्ट होण्यासाठी आवश्यक असणार्या एकूण हजेरीसाठी केवळ मोबाईल ॲपवर नोंदविलेली हजेरी ग्राह्य धरण्यात येईल.

12. नियमावलीनुसार प्रशिक्षणाचा किमान कालावधी पूर्ण करणे अनिवार्य असल्यामुळे आवश्यक हजेरीची पूर्तता करणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक आहे.

**मोबाईल हजेरी ॲपचे फायदे ÷**

1.संस्थेच्या 30 मीटर परिघातूनच अटेंडन्स लावणे शक्य असल्याने अनधिकृत संस्थांना व अनधिकृत प्रवेशांना आळा बसेल.

2.सदर एप्लीकेशन एकापेक्षा जास्त मोबाईलवर (Wifi असल्यास बिना सिम च्या मोबाईलवर सुद्धा चालेल) इन्स्टॉल करणं शक्य असल्याने कोणताही एकच मोबाईल संस्थेत राहावा याचे बंधन नाही. त्यामुळे हजेरी नोंदवण्यात सुलभता येणार असून संस्थाचालकांना एकाच मोबाईलवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही.

3.मोबाईल ॲप वर हजेरी घेताना मोबाईल कॅमेराद्वारे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याची ओळख / पडताळणी केली जाईल. या पद्धतीमध्ये हजेरी नोंदवताना चेहऱ्यावरच्या हालचालीची नोंद घेतली जाईल व पर्यायाने गैरप्रकारांवर आळा बसेल.

4.मोबाईल ॲप अटेंडन्स द्वारे विद्यार्थी संस्थेमध्ये खरोखरीच प्रशिक्षण घेत आहे किंवा कसे? संस्थाचालकाने अनाधिकृत विद्यार्थी नोंदवले आहेत किंवा कसे? याची नियमित पडताळणी परीक्षा परिषद पातळीवर करणे सहज शक्य होईल.

5.निकटच्या काळामध्ये फेस बायोमेट्रिक पद्धतीचा वापर परीक्षेच्या वेळी करण्यात येणार असल्यामुळे, संस्थेमध्ये प्रशिक्षणाचे वेळी जे फेस इम्प्रेशन नोंदवलेले असेल, तेच परीक्षा केंद्रामधील प्रवेशाच्या वेळी देखील मोबाईल ॲपच्या माध्यमातून आपोआपच ग्राहय धरण्यात येईल. या कृतीमुळे परीक्षेतील गैरप्रकारांना आळा बसेल.

6. हजेरी ॲपमुळे संस्थाचालकांना प्रत्येक विद्यार्थ्याची किंवा प्रवेशित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची दैनिक/ साप्ताहिक/ मासिक हजेरीचा तपशील डिजिटल स्वरूपात एका क्षणातच उपलब्ध होणार आहे. संस्थाचालकांना विद्यार्थ्यांची हजेरी डिजिटल स्वरूपात साठवली जाणार असल्यामुळे, वेगळ्याने रजिस्टरवर नोंदविण्याची आवश्यकता नाही.

मोबाईल हजेरीबाबत किंवा ॲप संदर्भात कोणतीही शंका असल्यास आपल्याला खालील हेल्पलाइन व ईमेल पत्त्यावर संपर्क साधता येऊ शकेल:-

**Help Line Mobile Number :- 8850284842**

**Email Address :-** Gcctbcsupport@gmail.com

**मोबाईल हजेरी ॲपची लिंक पुढीलप्रमाणे आहे :-**

**https://msce-attendance.vercel.app**

सदर मोबाईल ॲप संस्थाचालकांनी पुढील सात दिवसांचे आत इन्स्टॉल करून त्यावर विद्यार्थ्यांची हजेरी नोंदवणे बंधनकारक आहे. **जून, 2026 मध्ये व त्यापुढील होणाऱ्या सर्व संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी या हजेरी ॲपमधील विद्यार्थ्यांच्या फोटोंचा वापर करण्यात येणार असल्यामुळे, सर्व संस्थाचालकांना विद्यार्थ्यांची हजेरी या ॲपमध्ये नोंदविणे अनिवार्य आहे, अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थाचालकांची असेल.**

5/5/26

**डॉ.नंदकुमार बेडसे (भा.प्र.से),**
**अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे.**

**प्रतिलिपी :-**

1). मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांना माहिती करीता सविनय सादर.

2). मा.आयुक्त (शिक्षण), पुणे यांना माहितीस्तव सादर.

3). विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

4).शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (सर्व), शिक्षण निरीक्षक, मुंबई (सर्व) यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित. आपल्या स्तरावरून सर्व संस्था चालकांना मोबाईल हजेरी ॲप बंधनकारक असल्याबाबत सूचित करावे व स्थानिक पातळीवर त्यांची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे किंवा कसे? याची देखील नियमितपणे संस्थांना भेट देऊन पडताळणी करावी.

5). संगणक टंकलेखन संस्थाचालक(सर्व) यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित. सदर ॲपचा वापर पुढील कालावधीसाठी प्रत्येक सत्राकरिता कायमस्वरूपी करावयाचा असून विद्यार्थ्यांना याबाबत नियमितपणे अवगत करावे.